९८६२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
स्थं. क्र. १५९६

# ...ळपे पापणींत!

( प्रातिनिधिक कविता संग्रह )

REFBK-0012710
REFBK-0012710

प्र मो द प्र का श न, नां दे ड.

मुद्रकः– हनुमान प्रिंटिंग प्रेस, परभणी.

५१०९
३५३२८
१७.८.६३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
नोंदणी ३५३२८ वि: काव्य
ता. १७.८.६३
क्र: १५८८

# चंद्र लपे पापणींत !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
ग्रं. क्र. 92690
संदर्भ कोश

( प्रातिनिधिक कविता संग्रह )

REFBK-0012710
REFBK-0012710
स्थळप्रत.
मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 3.4.3.2.6 वि: काव्य
क्रमांक ............ नों दि ....

प्र मो द प्र का श न नां दे ड

: प्रकाशक :

प्रमोद प्रकाशन,
वजीराबाद, नांदेड.

: मुद्रक :

हनुमान प्रिंटिंग प्रेस, परभणी.

: मुखपृष्ठ :

श्री. पांडे
अभिनव चित्रशाळा, नांदेड.

: प्रमुख विक्रेते :

मॉडर्न बुक एजन्सी,
वजीराबाद, नांदेड.

मराठवाडा साहित्य भांडार,
परभणी.

★
★★

मूल्य : एक रुपया पन्नास नये पैसे

श्री. नरहर कुरूंदकर

व

श्री. त्र्यंबक महाजम

यांसी

--: स्नेहादरपूर्वक समर्पण :--

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........ वि: काव्य
क्रमांक ....१५८८५.... नों दि. १०.१०.

# अनुक्रमाणिका


| अ. नं. | कवितेचे नांव | पान क्र. |
| --- | --- | --- |
| | **श्री. रा. स. देशपांडे** | |
| १ | चंद्र लवे पापणींत | १ |
| २ | पान पिकलेल्या गालीं | २ |
| ३ | काय येईल फिरुन | ३ |
| ४ | एक विटेवर अवघडलेला | ४ |
| ५ | तुज संबोधन कसे करावे | ५ |
| ६ | सर ओसरुन गेली | ९ |
| ७ | अशीच होती सांज मुलायम | १० |
| ८ | आली दुपारी दारांत | १० |
| ९ | कोमल करपाश तुझा | १३ |
| १० | कधी भेटतां | १५ |
| ११ | रात्र नितळतें मनीं | १६ |
| १२ | ही शीतल शामश्री | २१ |
| १३ | दीप तुझ्या नयनांचे | २३ |
| | **श्री राम मुकादम** | |
| १४ | एकच आणि एकदांच | ६ |
| १५ | विराट मानव | १७ |
| १६ | नभ मेघांनी दाटले | १८ |
| १७ | ठेविले अनंतें | १९ |
| १८ | ओशाळलेला घाट आहे | २० |
| १९ | मानवता करिते अभिवादन | २५ |
| २० | कार्तिकांतली पहाट गोरी | २७ |
| २१ | ओझरती तूं नजर वळवितां | २८ |
| २२ | भावनेच्या देव्हाऱ्यांत | २९ |
| २३ | प्रीतिची रीत | ३० |
| २४ | भग्नप्रीति | ३१ |
| | **श्री. श्री. दि. अिनामदार** | |
| २५ | धा तिरकट ता तिरकट् | ३२ |
| २६ | महाकवीची मूर्त कल्पना | ३५ |
| २७ | चुंबन धुंदी | ३६ |

| | | |
|---|---|---|
| २८ | बस स्टँडवर | ३७ |
| २९ | ऍलमा-पैलमा | ४० |
| ३० | रंगपंचमी | ४१ |
| ३१ | ताई आज भाऊबीज | ४२ |
| ३२ | कृष्णासाठीं राधेसाठीं | ४४ |
| ३३ | अर्थ लावितो | ४५ |
| ३४ | आले आले ज्ञानदेव | ४६ |
| ३५ | सणासुदीचा विडा रंगला | ४८ |
| ३६ | तांबुस तिरकस उन्हे फिरकली | ४९ |
| | **श्री. प. श्री. संभूस** | |
| ३७ | ओल्या नारळाचा कीस | ५० |
| ३८ | दीस | ५१ |
| ३९ | तूंच पाऊल पुढे टाक | ५२ |
| ४० | अहिल्या | ५३ |
| ४१ | अखेर मी अपुराच राहिलो | ५५ |
| ४२ | माझ्या अंबानगरीत | ५७ |
| ४३ | सावल्यांच्या साम्राज्यांत | ५८ |
| ४४ | परत सखे | ५९ |
| ४५ | अशा तुडुंब डोहांत | ६० |
| ४६ | चमकते तारांगण | ६१ |
| | **श्री. रघु बोरगांवकर** | |
| ४७ | चंद्र लपे पापणींत | ६२ |
| ४८ | ऑफीसचा रंग | ६३ |
| ४९ | अभ्यास | ६५ |
| ५० | ओढ | ६६ |
| ५१ | आज आलीस स्वप्नांत | ६७ |
| ५२ | एका भक्तासाठीं | ६८ |
| | **श्री गोपाळराव वांगीकर** | |
| ५३ | भरल्या पोटी ब्रम्हज्ञान | ६९ |
| ५४ | अन् गंगावनहि पडे गळून | ७१ |
| ५५ | गृहिणी आणि पाकशास्त्र | ७२ |
| ५६ | नर्क आणि वकिल | ७१ |
| ५७ | कोण पुढे तूं होशिल बाळा | ७२ |

# आरंभी

" चंद्र लपे पापणींत " हा सहा कवींचा काव्यसंग्रह रसिकांच्या हातीं देतांना आम्हाला अत्यानंद होत आहे. साहित्य क्षेत्राशीं विशेष संबंध नसतांनाहि हें अल्पसे धाडस करुन साहित्य सेवेची संधी लाभल्याबद्दल हा आनंद द्विगुणीत होत आहे.

व्यवसायानिमित्त कराव्या लागलेल्या प्रवासांत जुने मित्र भेटले. त्याचप्रमाणें अनेकांच्या नवीन ओळखी झाल्या. या भेटी व ओळखींतूनच या संग्रहाची कल्पना सूचली. त्यांतच कांहीं साहित्यिक मित्रांनी सहकार्याचा हात पुढे केला व प्रोत्साहन दिले. संकल्पाप्रमाणें सिद्धि होईलच असें नाहीं. म्हणूनच संग्रहाची कल्पना प्रत्यक्षांत उतरेपर्यंत अपेक्षेपेक्षां अधिक विलंब लागला. त्यामुळें बऱ्यांच मित्रांची गैरसोय झाली. याची जाणिव ठेऊनच आम्ही त्याबद्दल दिलगिरी व्यक्तवित आहोत.

प्रा. दि. के. बेडेकरांनी संग्रहाला प्रस्तावना देऊन आमच्या उपक्रमाचे कौतुक केले. त्यामुळें उत्साह अधिकच वाढला. श्री. वांगीकर व श्री. बोरगांवकर यांच्या कविता ऐनवेळीं प्रविष्ट केल्यामुळें प्रस्तावनेंत त्यांचा उल्लेख येऊं शकला नाहीं.

अभिनव चित्रशाळेचे संचालक श्री. वसेकर व त्यांचे सहकारी श्री. पांडे यांनी मुखपृष्टाची जबाबदारी आपल्या अंगावर घेऊन आमचे श्रम बरेच कमि केले. हनुमान प्रिंटिंग प्रेसचे चालक श्री. एम. एन. बाकळे यांनी छपाईचे काम आपले स्वतःचे समजून आत्मीयतेनें करुन दिल्यामुळें हा संग्रह या स्वरुपांत आपणासमोर येऊं शकला.

संग्रहांतील सहा कवीनी आपल्या कविता प्रसिद्धीसाठीं देऊन मराठी काव्यदेवतेच्या सेवेची संधी दिल्यामुळें त्यांचे औपचारिक आभार मानणे म्हणजे केवळ थट्टाच होय. त्यांच्या सहकार्याचा गौरव करण्यासाठीं आमचे शद्ब अपुरेच पडतात.

वरील व्यक्तींशिवाय प्रा. हेमचंद्र धर्माधिकारी, श्री. देवदत्त तुंगार, श्री. त्र्यंबक तांबोळी व इतर मित्रांनीं वेळोवेळी सहाय्य व मार्गदर्शन केले त्यामुळें संग्रहाला एक आगळे वैशिष्ट्य आले.

संग्रहाची कल्पना ही नवीन. त्यांत साहित्यसंबंध दुरावलेले. अगदि थोडा वेळ. व व्यवसाय सांभाळून केवळ हौस म्हणून हातीं घेतलेला उपक्रम. यामुळें यांत बऱ्याचशा चुका राहण्याची शक्यता अधिक. त्याबद्द रसिकजन सहृदयता व विशाल दृष्टिकोण बाळगून आम्हांस दोष देणार नाहींत अशी खात्री वाटते.

या संग्रहाचे स्वप्न मूर्त स्वरुपांत आणण्यासाठीं अनेकांनी जें सहकार्य दिले त्यांचे केवळ आभार मानून ऋणमुक्त होतां येणार नाहीं. संग्रह प्रकाशित करण्यांसाठीं आमच्यापेक्षां इतरांनीच अधिक श्रम घेतले म्हणून या निमित्ताने अेवढेच खरें कीं,

फोडीले धन्याचे भांडार । धन्याचा हा माल ।
मी तो हमाल । भार वाही ॥

नांदेड
१ जुलै १९६२

–बा. ना. रावके
–व्ही. आर. भुसारी
–प्र. ना. रावके

# प्रस्तावना.

या संग्रहांतील ७३ कवितांचें हस्तलिखित श्री. संभूस यांनीं माझ्याकडे आणून दिलें. नंतर त्यांचें आणि श्री. मुकादम यांचें अशीं पत्रें आलीं. प्रस्तावना लिहिण्याचें एक काम आपल्याला करावयाचें आहे या भावनेनें व कामाचा कंटाळा येतो या नियमाप्रमाणें हस्तलिखित वाचण्यासाठीं घेण्याचा मी आळस करीत गेलों. पण आज पहाटे अचानक व सहज मनांत आलें आणि एका मागून एक साऱ्या कविता मी वाचीत गेलो. कविता संपल्या आणि कांहीं तरी विलक्षण अनुभव मनापुढें तरंगत व रेंगाळत राहिले. माझी खोली तशी रुक्ष आहे व खिडक्यांतून पलीकडच्या घराची भिंत दिसते. पहाट असून पावसाची झड चालू असल्यानें सगळें चिंब व कुंद

वातावरण आहे. पण कविता संपल्यानंतर मला वाटलें, एका उंच टेकडीवर आपण उभे आहोत. समोर वनश्री पसरली आहे. आकाश नितळ व जणूं कसल्या तरी मंद सुगंधानें भरलेलें आहे. पलीकडे दूर एक गांव दिसत आहे. बहुधा ती अंबेजोगाई असावी !

कवितेंतल्या शब्दांना असा कांही तरी चमत्कारिक, वेगळा आणि अकल्पित अनुभव देण्याचें सामर्थ्य असतें खरें. त्यामुळें मला अशी कांही वेगळीच पहाट अनुभवण्यास मिळाली. व श्री संभूस यांच्या एका कवितेतील ओळी मनांत आल्या—

" अशी गोमटी पहाट
तिला हुंगावे हुंगावे "

आकाशांतून कांहीं वेळीं ढगांच्या आकृतींचा आणि रंगढंगाचा खेळ आपण पाहतो आणि कांहीं वेळीं मात्र आकाश अगदीं रिते असतें. पण त्या रितेपणांतहि चार पक्षी कधीं ओळीनें तर कधीं चौकोनी आकृति बनवून वाऱ्यावर हेलकावे खातांना पाहून मन त्या पक्षांबरोबर धांवूं लागतें. या पक्षांना काय दिसत आहे ? त्यांनी कोठें जावयाचे आहे ? वाऱ्याच्या झोताचे इशारे घेत यांचे पंख कसे हालतात ? असें मग मनांत येत राहतें. या कविता लिहिणाऱ्या कवीच्या कल्पनाबरोबर अशीच पाठशिवणी माझ्या मनानें केली.

या कविता वाचतांना मला एक जाणवलें कीं यांतल्या एकेका कवीच्यां कवितेंत आणि सर्वांच्या मिळून झालेल्या संग्रहांत कोठलीहि चाकोरी नाहीं, कृपणपणा नाहीं व नकली नवेपण नाहीं. श्री. इनामदारांची ' महाकवीची मूर्त कल्पना ' ही कविता केशवसुत – बालकवींच्या अगदी जुन्या घडणीची व म्हणून सुंदर वाटते. त्यांच्याच ' तांबुस तिरकस उन्हे फिरकली ' या कवितेंत एकटेंच बालकवि दिसूं लागतात आणि त्यांतच थोडी नवी तिरकसपणाची तिरीप उसटते. पण ' लाल चुटुक डोळ्यांचा पक्षी ' या त्यांच्या कवितेंत एक वेगळीच गूढता आहे. श्री. संभूस यांच्या ' माझ्या अंबानगरींत ' या कवितेंत एक निरागस व तितकाच हृदयवेधी असा आपल्या मायनगरीबद्दलचा कोवळा भक्तिभाव आहे. पण त्यांच्या दुसऱ्या कवितेंत हा साधेपणा जाऊन त्याच्या जागीं

" अंधाराच्या खोचलेल्या<br>
ओच्यांतून डोकावणारी<br>
पहाटेची मांडी "

अशा नव्या घडणीच्या प्रतिमा डोकावूं लागतात. अहिल्येचें दुःख सांगतांना श्री. संभूस यांची सहृदयता जागी होते, पण दुसऱ्या कवितेंतून स्वप्नांतील चोरवाटांनी त्यांच्या कल्पनेचा संचार होऊं लागतो.

श्री. देशपांडे यांच्या कवितेंत जरा वेगळेपणा दिसतो तो त्यांच्या नास्तिक कवितांतून. ‘एका विटेवर अवघडलेल्या’ देवाला ते आळवतात आणि शेवटी दुसऱ्या एका कवितेंत म्हणतात.,

" म्हणुन फुकाचें नाम घेउनी
कुणी तुझें व्याकरण करावें
एक न लागे तरीहि अक्षर
रडत वाचुनी हंसत मरावें "

त्यांच्या कवितांतून मर्ढेकरांनीं जोपासलेल्या व्यस्त अंतर्विरोधी प्रतिमांची छाया दिसते आणि कांही कवितांतून दुर्बोधतेचा स्पर्श जाणवतो. पण हा प्रकार अगदी थोडा आहे. उलट त्यांच्या बहुतेक कवितांतून साधी व सुंदर रचना प्रत्ययास येते. ‘ रात्र नितळते मनीं ’ यांतील पुढील ओळीमध्यें जुन्या व नव्या आविष्कार - पद्धतींचा मिलाफ झाल्यासारखा वाटतो.

" दूर उजळी अंतरा
जरी मावळला राग
तुझा नक्षत्र अबोला
जाई सांडून पराग "

श्री. मुकदम यांची कविता वरील तीन कवींच्या कवितेपेक्षां थोडी वेगळी आहे. सृष्टीच्या प्रेमानें रंगून त्यांनी पुढील ओळींत किती नीटस चित्र रंगविलें आहे.

" नभ मेघांनीं दाटलें
जांभुळल्या दाही दिशा
क्षितिजांतून झरती
धुंद निळ्याशार आशा ,,

मेघांनीं दाटलेल्या क्षितिजावरील रंगाबरोबरच प्रणयाच्या धुंद क्षितिजावरील रंगहि त्यांच्या कवितेंतून दिसतात. परंतु त्यांच्या मनाला मानवी सुखदु:खें आणि मानवाचें भवितव्य यांची आंच जास्त प्रखरपणें लागलेली दिसते. ' एकच आणि एकदाच ' या दीर्घ कवितेंत हिरोशिमाच्या प्रलयांत भस्म झालेली बालिका स्वाक्षरी मागावयास येते अशी मोठी विलक्षण कल्पना आहे व दीर्घ असूनहि त्या कवितेमध्यें कल्पनेचा ताण व लय शेवटपर्यंत कायम राहतो.

अशा तऱ्हेनें हे कवी कधीं सृजनाच्या गाहिऱ्या हिरवेपणानें तर कधीं प्रणयाच्या मस्तीनें, कधी मानवतेच्या दु:खानें तर कधीं गूढ अद्‌भुताच्या स्पर्शानें हेलावलेले दिसतात. त्याचे शद्ब या अशा अनुभवांचीं विद्याधरी सृष्टि तुमच्या मनांत उभी करूं शकणारे आहेत. थोडी कृत्रिमता, प्रतिमांच्या व शद्बांच्या बाबतींत खटकते; पण ठेचा लागणाऱ्या जागा थोड्या आहेत आणि साधी लयबद्ध, अर्थवाही रचनाच जास्त आहे. श्री. इनामदारांच्या "ऐलम्मा पैलम्मा" या कवितेसारख्या कवितांतून तर अर्थ नाद व लय यांची सुंदर गुंफण आढळून मन त्या लयींत अडकून पडतें.

अशी ही कविता आज संग्रहरुपानें रसिकांपुढें येत असतांना तिची गोडी सांगण्याचें काम माझ्याकडे आलें व तें आतां पुरें करतों. शेवटी माझ्या मनांत एक आलें तें सांगावेंसें वाटतें. जुनी व नवी मराठी कविता हा भेद आहे व तो जाणवणारा आहे. पण आतां या संग्रहांतील कविता वाचतांना मला जाणवलें कीं तो भेद गिळून टाकणारी, केशवसुतापासून मर्ढेकरापर्यंतच्या काव्यसंपदेची अभावितपणें साठवणी करणारी व त्यांतून नवें निर्माण करणारी, सांप्रदायिक कृपणपणांतून व अनुकरणाच्या गुलामी-तून मुक्त होणारी मराठी कविता तरूण कवींच्या मनांत आज तरंगत आहे. आज तिचीं पावलें अडखळत आहेत व तिची झेप उतुंग नाहीं, पण तिचें क्षितिज निरभ्र आणि विशाल दिसत आहे.

कवितेची ओळख कवितेनें स्वतःच करुन द्यावयाची. मी जी ओळख येथवर करुन दिली ती रसिकांना आमंत्रण देण्यापुरती आहे.

पुणें
१ जुलै १९६२

दि. के. बेडेकर

# श्री. रा. स. देशपांडे

श्री. रा. स. देशपांडे यांच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्वाच्या वेधक पैलूंचें दर्शन त्यांच्या सहवासांत राहूनच अधिक स्पष्टपणानें होऊं शकतें. ऐरव्ही वरवर आतिशय शांत व प्रसन्न दिसणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू त्यांच्या सहवासोत्तर काळांतच दिसून येतात. मराठवाड्यांतील स्वतंत्र प्रज्ञा असलेले एक विचारवंत म्हणून त्यांचा उल्लेख करायला हवा. नव कवितेची जाण व निर्मिती बरोबरच त्यांचा राजकीय व वाङ्मयीन अभ्यास सुद्धा उल्लेखनीय आहे. सहासात वर्षें योगेश्वरी विद्यालयांत अध्यापन केल्यानंतर आलिकडे त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरुं केला असला तरी त्यांची काव्यनिर्मिती व ज्ञानसाधना अखंड चालूंच आहे. अंबेजोगाइचें कविकुलगुरु म्हणून त्यांना संबोधणें उचित ठरेल.

मराठा ***... स्थळप्रत.
अनुक्रम ३५३२८ वि: काव्य
...

# चंद्र लपे पापणींत

चंद्र लपे पापणींत
    रात्र सखे सरती ग
        रात्र सखे सरती
झिळमिळ झोप लवे
    तुझ्या डोळ्यावरती ग
        तुझ्या डोळ्यावरती
सैल मिठी वाऱ्याचीही
    शीतलशी परती ग
        शीतलशी परती
उजळती काळोखाला
    येई सुख भरती ग
        येई सुख भरती
कण क्षण दरवळे
    तृप्ति अशी झरती ग
        तृप्ति अशी झरती
निथळली रात्र आतां
    दंव - ओली धरती ग
        दंव - ओली धरती
रक्त-लय क्षितिजाला
    मिळे थरथरती ग
        मिळे थरथरती
पहांटते कुशीमध्यें
    रात्रीपारिस रती ग
        रात्री-परीस रती

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 12090.

# पान पिकलेल्या गालीं

पान पिकलेल्या गालीं
स्मित केशरी कळीचें
कात कवडसे टाकी
मन हंसरें खळीचें

खुळा चावतेस देंठ
पान लावतां कळीचें
स्वप्न रंगलें आधीच
लाल ओठ पाकळीचे

छान ठसली लवंग
तुझी शपथ गळ्याची
स्वर - वेलची पट्टींत
घमघमल्या कळ्यांची

# काय येईल फिरून

काय येईल फिरून
अशी मायेची पहाट
गाय तांबुरी ती दारीं
पाहे हंबरुन वाट

तिची उजळती कांस
ओती चैतन्याच्या धारा
खूर उधळून चारी
जाई बागडत वारा

व्हावे चाटून तयाचें
अंत्र नितळ निर्मळ
वर चमकावी ओली
कुठे लडिवाळ लाळ

दीस परी आला वर
एक घेऊन कासरा
गेली गाय दूर रानीं
इथे सोडून वासरा

पडतसे आतां गळां
किती बंधनाचा पीळ
कसा आठवून पान्हा
भिजे तुटणारा तीळ.

# एक विटेवर अवघडलेला

एक विटेवर अवघडलेला
किती युगांचा असशी निश्चळ
अगतिक होउन इथे उभा तूं
किती सोसशी निमूट हा छळ

तुज भंवती हा पडे गराडा
तुझे कटीवर हताश हात
समर्थ अपुल्या भक्तांच्या अन्
लीला बससी स्तब्ध पहात

तव नामाचा अगाध महिमा
कान किटविती मृदंग टाळ
तुझ्या गळ्यांतिल तुळशीमाळा
नित्य घडविती तुला विटाळ

ही यात्रेची भाविक गर्दी
तव पूजेची परी मिरास
विश्वंभर तूं दुबळा भोळा
तुला राउळीं तुरुंगवास

जगजेठी, तुज ओढुन आणी
पुंडलिकाची येथे भक्ती
मिळेल आतां तुला दयाघन
कुणा नास्तिकाकडून मुक्ति !

# सर ओसरुन गेली

सर ओसरुन गेली
पंख ओले पापणींचे
खुदकन हंसें मुखीं
ऊन्ह पिवळ्या चुंचीचें
टकमक डोळ्यांतील
थेंब सांडती गालींचे
पिसें लावुनिया जाती
क्षण मन - घरणींचे
झेप गगनाच्या गळां
इवल्या हातवाऱ्याची
मूर्त घडविली अशी
आज नाचऱ्या पाऱ्याची
ढग ढळला पदर
पडे पांखर छायेची
ओठीं चिंबल्या उन्हांत
मिठी साखर मायेची

# अशीच होती सांज मुलायम

अशीच होती सांज मुलायम
क्षितिजांचे तव हात बिलोरी
अशीच होती अंबाड्यावर
गजऱ्याची तव कोर फुलोरी

असाच होता मंद मंदसा ....
श्वास कांपरा तुझा सुगंधी
असेंच होतें विरळ चांदणें
तरळ लोचनीं तुझिया धुंदी

अशीच होती वाट .... एकटी
त्याली छाया तलम सांवळी
वळणावरती होउन पुलकित
लवली होती वेळ कोंवळी

इथेच झाली होती किमया
माणिकांचन ते होते गडले
रसरंगाचें स्वप्न मनोहर
ओठांनी तव खंडित घडलें

नकळत गेलिस निघुन घडीसम
दिशाहि साऱ्या होत्या दडल्या
अंधारावर प्रसन्न परि त्या
लक्ष चांदण्या होत्या पडल्या

# आली दुपारीं दारांत

आली दुपारीं दारांत
सान भिकाऱ्याची पोर
सामावलेली याचना
तिच्या डोळ्यांत टपोर
" वाढ माय वाढ " तिची
तार करुण ती वाणी
पाय धुळीनें माखले
चालताना अनवाणी
चिंधी कटीला फाटकी
बांधलेली मळकट
आणि हातीं एक वाटी
तिच्या काळी कळकट
अस्ताव्यस्त पाठीवर
सारी सुटलेली वेणी
किती दिसांत केसांना
नाही लागलेली फणी
म्लान गोरटें हो मुख
ओठ कोमल कोरडे
' वाढ माय वाढ ' परी
तार स्वरांत ओरडे

'वाढ माय वाढ' तिची
हांक कानावर येत
बाळे घरांतील तिला
टाकलीं तीं वेडावत
'वाढ माय वाढ' तोंच
रुद्ध शब्द पुन्हा आले
कां न कळे डोळ्यामध्यें
तिच्या पाणी ओथंबलें
कळी इवली पडावी
धुळींत कीं पायदळीं
सान सबाष्प उघडी
तशी बालिका कोवळी
उचलून वाटे तिचं
मुख चुंबाव गोमटं
आणि टाकावी पिऊन
तिची आंसवं कोमट

*****

# कोमल करपाश तुझा

कोमल करपाश तुझा
घातलास जंव कठीं
आणि सुधा-स्निग्ध ओठ
लाविलेस तूं ओठीं
संवेदन प्रतिगामीं
सुखदायी तें भरलें
स्पर्शानें सखये तव
अंतरही मोहरलें
चिरविरही हृदयांच्या
जणुं पडल्या त्या गांठी
मूकतेंत विरघळल्या
मधुर किती गुजगोष्टी

शांत तुझीं सुंदर तीं
मिटलेलीं नयनदळें
श्वासांतुन मंद तुझ्या
गंध मधुर तो उधळे
भासति कीं मोत्यासम
घर्मकणहि तव भाळीं
हालतसे उन्नत अन्
उरोभाग वरखालीं
गौर तुझी अर्धावृत

ती कोमल तनु-कदली
सुंदरता निद्रित मीं
लुटली स्वप्नामधली

नच आतां भेटीची
उरली उत्कट ओढ
नच उरला उन्मादहि
आलिंगनिं तो गाढ
सहवासीं नच आतां
आसक्ती पूर्वींची
आंचही न जाणवते
आतां ती विरहाची
मोहवील केंवि अतां
ती सक्त सुंदरता
प्रीतीची मज कळली
परिणामीं भंगुरता

# कधी भेटतां

कधी भेटतां जाशी भुर्रकन्
फुलवित आपुला पदर पिसारा
टाकुन हंसरा एक तरळता
पीस–कोवळा मधुर इशारा

पळांत जाशी दूर झुळुकशी
वाऱ्यावरती जरा शहारा
तुझी लागतां चाहुल चंचल
लवे डहाळी झुले सहारा

लपसी बिलगुन तिथे जराशी
मूक बावऱ्या कातरपानीं
विसावते अन् तशी अंमळशी
तुझी कोंवळी किलबिल कानीं

सहज मारुनी जाशी घिरटी
परतुन फिरते सुरेल तान
जातां जातां टिपून घेशी
तूं नजरेचे दाणे दोन

—०—

# रात्र नितळते मनीं

रात्र नितळते मनीं
शीतळत्या अंधाराची
मध्यमांत कोमल ती
हुरहुर गंधाराची
कधी लाविते अशीच
तुझी आठवण वेडी
पिळलेली हृदयाची
तार आगंतुक छेडी
दूर उजळी अंतरा
जरी मावळला राग
तुझा नक्षत्र अबोला
जाई सांडून पराग

# ही शीतल श्यामश्री

ही शीतल श्यामश्री
घेउनिया श्रावण ये
जलदापरि उंबरुनिया
देहीं तव यौवन ये १

अवसर का वर्षुनिया
जाइल ते नितळ सरी
ओघळेल वक्षीं तव
मौक्तिक–माला हंसरी २

फिरुन सखे येइल हा
श्रावण ऽ पण यौवन गे
हंत ! घडीभर वर्षे
घन सम हें जीवन गे ३

* * *

टप टप हे आले बघ
उज्ज्वल किती थेंब सखे
टिपुन किती घेशिल तूं
यांतुन हीं तरळ सुखें ४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२५७०

सरसर या बिंदूतुन
बघ सुवर्ण हें झरतें
क्षण चमकुन अवकाशीं
अनंतांत अन् विरतें ५

घेइ तृणासम न्हाउन
जरतारी आज जलीं
सरतां हा सेक स्मृति
नटविल पातीं भिजलीं ६

* * *

सत्वर या थेंबासम
काल–क्षण ओघळती
पार्थिव हे देह तयां —
सह कणकण विरघळती ७

पडलेलें जल खालीं
वाहुन जातें जिरुनी
नश्वर अन जीवांची
जाइ स्मृतिही विरुनी ८

प्रस्तर परि फुटुन कुठें
जळ निर्मल पाझरतें
अमर कुठें जीवनही
दर्शन देही ओझरतें ९

* * *

# दीप तुझ्या नयनांचे

दीप तुझ्या नयनांचे सखये दीप तुझ्या नयनांचे
दीप्त प्रकाशित त्यांत शलाका मधु-तेजाची नाचे

भरले ओतप्रोत स्नेहीं
विमल परी ते दीप विदेही
अविरत मम उजळतात गेहीं
कांचन-जल कीं शिंपिति सखये उज्ज्वल या किरणांचें

शांत तेवतां निश्चल नीरव
पसरिति अपुलें मंगल मार्दव
आणि गुणांचें आंतर गौरव
वितरिति किंवा तेज निथळतें अगाणित हे रत्नांचें

कधि शंकाकुल होउन कंपित
वरिति मंदता कशी अकल्पित
चित्र परी हें होई शिल्पित
जळांत लोलक लकाकती कीं युगुल जसे मीनांचें

वक्र भ्रुकुटिचा धूर कधी वर
कृतक रागही दिसे लालसर
तरळे द्युतिपरि क्षणीं दिव्यतर
पराग रंगीत सहज केशरी वर्षिति शर मदनाचे

यांत प्रीती तव वत्सल वसते
विमल तुझें लावण्य विलसतें
चिर यौवन ही आशा हंसते
स्रवती यांतुन पुलक प्रसादित अनंत कीं स्वप्नांचे

तव पर्युत्सुक प्रदीप्त लोचन
घेइ पतंगापरि मी चुंबुन
कणकण होउन तोंच सचेतन
हृदयीं भरती कुंभ भराभर किति सुभग भावनांचे

००००

## श्री. राम मुकदम

श्री. राम मुकदम यांनी मराठवाड्यांतील प्रतिथयश कविमध्यें वरचे स्थान पटकावले आहे. मराठवाड्यांतील रसिक जनता चांगले भावगीतकार म्हणूनहि त्यांना ओळखतें. ‘दीपलक्ष्मी’, ‘मराठवाडा’, ‘प्रतिष्ठान’ इ. नियतकालिकांतून त्यांच्या कविता प्रसिद्ध होत असतात. लोकगीतांची रचना करुन सामाजिक चळवळ पुढें नेण्याचा त्यांनी नेटानें प्रयत्न केला आहे. त्यांची शास्त्रीय संगीताची उपासना अखंडपणें चालूं असून अंबेजोगाई येथील ‘कलाकेंद्र’ या संस्थेचे ते सदस्य आहेत. औरंगाबाद नभोवाणी केंद्रावरुन अनेकदा भावगीत गायनाची संधी त्यांना मिळाली होती.

# एकच आणि एकदांच

मी तुझें बंद दार
खटखटते आहे . खटखटते आहे.
तुझा उंबरठा दाराचा
क्षणांत ओळखीचा झाला
एकच....आणि एकदांच . ....
तुझी स्वाक्षरी हवी मला !
जर माझे अगम्य रुप—
नाहीं पाहूं शकलास तर ....
भिऊं नकोस !
मेलेल्यांना कुणीतरी
सांग पाहूं शकेल काय ?

तपा पूर्वी एका घरांत
होतें मी जिवंत
' हिरोशिमा ' च्या मातीचा
मादक घेत सुगंध
' सहा वर्षे ' वेडा वारा
माझें जीवन ' हिरोशिमांत '
उनाडपणें होता उधळीत
सहा वर्षांचा तोच जीव
घेऊन माझ्या इवल्या मुठींत
कोमल करांनी बंद दार
खटखटतें आहे....खटखटतें आहे

हंसतोस काय ? ........
माझें जीवन सहा वर्षानंतर वाढलेंच नाही
कारण .... त्याच दिवशीं मरण केंव्हां आलें
कळलेंच नाही
कळलेंच नाही मला
उफाळलेल्या अग्निकुंडांत
प्रथम माझ्या सोनेरी —
केसांची पेटली वात
धगधगल्या ज्वालांनी केला
स्पर्श निळ्या डोळ्यांना
प्रेमानं कुरवाळीत लपेटलं बाहूंना
झाले परिवर्तन राखेच्या रुपांत.
स्वैरपणें थंड हवा जिला नेते उडवीत
इकडे तिकडे चोहींकडे, विश्वामध्ये मिरवीत
अतृप्त इच्छा माझी —
दौलतींसाठी नाही तुझ्याकडे झेपावत
कागदाचा जळावा कपटा,
तसा जीव होरपळलेला
हंसेल काय ? .... रडेल काय ?
अन् गोळाभर अन्नाची मला
चव तरी कळेल काय ?
तरी तुझें बंद दार ....
खटखटतें आहे .... खटखटतें आहे

बाक्षिशी हवी मला
अभिवचन हवें मला
केवळ नांवं .... एकच, एकदांच
कारण .... पृथ्वीचा पुन्हा पुन्हा
होऊं नये " हिरोशिमा "
विश्वामधले सारे जीव
असोत लहान अथवा मोठे
सहा वर्षाचे .... साठ वर्षाचे
अण्वस्त्रांच्या प्रलयांत
होऊं नयेत भस्मसात्
म्हणून तुझें बंद दार
खटखटतें आहे .... खटखटतें आहे
सहस्त्र कणांनी राखेच्या.

तुझा उंबरठा दाराचा
माझ्या झाला ओळखीचा
बाक्षिशी हवी मला !
अभिवचन हवें मला ! !
स्वाक्षरी हवी मला ! ! !
केवळ नांव .... एकच आणि एकदांच

# विराट मानव

नव्या युगाचा विराट मानव
बाहुबलाच्या हाकाटीने
अण्वस्त्रांची धुनी पेटवुन
जप शांतीचा करी मुखाने

कली युगांतिल शांती सैनिक
भस्म लावुनी सर्वांगाला
करीन म्हणतो क्षणांत एका
भस्मसात या अखिल जगाला

हा हटयोगी गरळ ओकितो
सामर्थ्याची पिवुनी भांग
धर्मपिठावर करि झुकलेल्या
नव्या नीतिचे ‘ छतिस ढंग ’

नि:स्वार्थाचे घालुन आसन
उरीं कवाळितो मानवतेला
रुद्राक्षी अन् घोट घेतसे
रुधिराचा भरभरुनी प्याला

# नभ मेघांनी दाटले

नभ मेघांनी दाटलें
जांभूळल्या दाही दिशा
क्षितिजांतून झरती
धुंद निळ्याशार आशा

संगमाच्या सीमेवर
श्वास कोमट धरेचा
आकाशाला मोह पाडी
ओलेतींच्यां पाकळ्यांचा

पाश्चिमेच्या माथ्यावर
सौदामिनी चमकली
सप्तरंगी मीलनाला
बघतांच चपापली

गंधावली धरा ओली
सर टपोर कळ्यांची
ओघळली डोळ्यांतून
फूलमाळ आसवांची

# ठेविलें अनंतें

हिर्व्या शद्बांच्या झालरींत
प्यारा पंछी गोरा मोरा
आश्वासनाच्या दांडीवर
अवघड बसला आहे,
' मोत्यांचा चारा चघळीत
अध्यात्माची अर्धी बुद्धी ........
फतकल् बसली आहे, ठाण मांडून
सोनेरी दांडीच्या .... समांतर रेषेंत
माळावरल्या कुजक्या .... माच्यावर.
संस्कृतीचें एरंडेल —
मुलायम कांचेच्या तडकणाऱ्या शिशींतून
गडगडलें आहे ........
सत्याच्या फरसबंद मकाणांत
विरक्तीचे ओशट ओघळ
वहात आहेत संथ लयींत
चिरक्या आवाजांत .... अर्थ लावीत
" ठेविलें अनंतें तैसेंचि रहावे,, चा !

# ओशाळलेला घाट आहे

ओशाळलेला घाट आहे
शेवाळलेला कांठ आहे
कांठावरल्या भारामुळें
एक वाकली पाठ आहे

गारठलेला पाय आहे
माथ्यावरती जाळ आहे
काळ्या काळ्या डोहावरती
सफेदीचा गाळ आहे

ओशट झाल्या शिळेशिळेवर
सपक् सुंइचा ताल आहे
सुरकुतलेल्या कांठावरती
हर जातीचा माल आहे

तलम चोळिचा चोळा आहे
त्यावर कुजका बोळा आहे
घाटावरल्या बगळ्याचा या
साऱ्यावरती डोळा आहे.

# मानवता करिते अभिवादन

आज तुझ्या मी पुण्य स्मृतींचे
क्रांतिकारका करितो चिंतन
शौर्यशालि तव बलिदानाला
मानवता करिते अभिवादन

भरत भूमिच्या मुक्तीसाठीं
स्वातंत्र्याचे बिगुल वाजे
दलित जनांची ध्येय पताका
हातीं घेउनि सैनिक उठले

समग्र जनता सिद्ध जाहली
यज्ञ क्रांतिचा करण्या अवघड
झुगारण्यास्तव मानेवरले
साम्राज्याचे जरखड जोखड

यज्ञभूमिच्या उठल्या ज्वाला
जाळित दाहि दिशांचे अंबर
वीर हुतात्मा वसंत पडला
हंसत मुखाने झुंजत संगर

स्वातंत्र्यास्तव मावळ तान्हा
कोंडाणा जिंकाया गेला
विजयश्रीने स्वागत केले
गड आला पण सिंह हरवला

इतिहासाची पुनरावृत्ति
वीरश्रीचा जुना पवाडा
नव्या पिढीच्या तान्हाजीवर
गावु लागतो ' मराठवाडा '

—oooo—

# कार्तिकांतली पहाट गोरी

कार्तिकांतली पहाट गोरी
भरल्या अंगीं डंवरुन आली
प्राजक्ताच्या रसांत न्हाउन
आवळीखाली गंधित झाली

पर्णांची वीणा झंकारित
छेडुन गेला खुपरा वारा
दंव-भरल्या भूपाली मधला
उगवतीस सम देत इषारा

नभांत झिळमिळ सप्त-सुरांचें
गर्भरेशमी स्वर-आंदोलन
अर्ध गुलाबी ओठावरल्या
क्षितिज कडांना गेलें उसवुन

★ ★ ★

# ओझरती तूं नजर वळवितां

*ओझरती तूं नजर वळवितां*
*गालीं माझ्या खळी उमटली*
*तव नयनांचें मीलन घडतां*
*ओठांची पाकळी उमलली*

*अधर तरंगीं भाव रंगतां*
*तुझीं लोचनें श्यामल हंसलीं*
*अबोल उन्मादांत प्रीतिच्या*
*तुझी पापणी मदाळ लवली*

*नकळत कातर भाव अनामिक*
*मनांत कांहींतरि चाळवले*
*पदराखालीं चुरगळलेल्या*
*उरांत कांहीं क्षण सळसळलें*

*विसावतां अन् मोहक काया*
*ठसे उमटले हृदयावरती*
*मृदुंगावर अंग रेलतां*
*शहारली मखमाली कांती*

—००—

# भावनेच्या देव्हाऱ्यांत.

भावनेच्या देव्हाऱ्यांत – नंदादीप तेजाळला
उजळल्या अंतरांत – ध्यान तुझें रे गोपाला

रंगाविली तव मूर्त यादवा
तन्मय होउनि केला धांवा
आतुरलें स्वप्नांत शोधिलें
नंदाकिशोरा मी तुजला

साठविल नयनीं रुपाला
श्यामल निर्मल मोहकतेला
व्याकुळलें परि ना कळलें कां ?
मोद मनाला हा झाला

अवचित अभिनव रसना नटली
भावगीतिका तींत उमटली
गुंतविलें मन तुजवरि जडलें
आसुसलें तव भेटीला

मधुर मुरलि सुर कानीं घुमले
अणुरेणू हृदयींचे नाचले
बावरलें क्षण वेडी झालें
तोल परी मी सांवरिला.

★★★

# प्रीतीची रीत.

उघडपणाने प्रणयसुखांची करिसि जाहिरात
प्रीतिची कसली ही रीत ?
पाणवठ्याच्या वळणावरले
कुचाळ डोळे तुझे हासले
पाउल माझें अन् अडखळलें
कण कण मोहरल्या अंगांतुन नाचला वसंत

चोरुनि आलें तुझिया साठी
अंधारांतिल पहिल्या भेटी
अमृत कण शिंपितांच ओठीं
उफाळलेल्या तारुण्याचे कळले संकेत

उरीं आजवरि मी जपलेले
द्राक्षं मखमली तूं कुस्करिले
मधु त्याचे नयनांत निथळले
ओठ तुझे विलगले प्यावया मधुकण कैफांत

थरथरत्या हृदयाचें स्पंदन
अधीरतेचें मृदु संवेदन
हवे कशाला त्यांचें वर्णन
शब्दांचा बाजार मांडुनी गायिलेस गीत

—००—

# भग्नप्रीति

गायिलीं मीं भावगीतें–भान नाहीं राहिलें
आळवीता प्रेमगीतें–गीत सारें संपलें

बहरली सुकुमार वेली–हृदयिं हांसू नाचलें
फुलविली फुलबाग तूं अन्–स्वर्ग सुख मज लाभलें

उसळल्या मनिं प्रणय लाटा–नेत्र माझे हांसलें
आसवांनी हांसऱ्या तव–गोड गाला चुंबिलें

उलटली किमया परंतू–हास्य माझें लोपलें
रम्य - प्रीती वैभवाला–ज्या क्षणीं तूं जाळिलें

मूक प्रीती हांक येतां--साद देण्या धावलें
धावलें परि वंचिलें तूं–स्वप्न माझें भंगलें

विरहवीणा धरुनि हातीं–मी सुरांना छेडिलें
वंचिलेली ' भग्न प्रीती '–गीत फिरुनी गायिलें

आळवीतां भग्न प्रीती–नयनिं आसूं दाटले
आसवांचे भाव मोती--आणि गालीं निखळले

—o—o—o—

# श्री. श्री. दि. इनामदार

श्री. श्री. दि. इनामदार हे मुळचे लातूरचे. अलिकडे या चार पांच वर्षांत व्यवसायानिमित्त लातूरहून अंबेजोगाईस आले. यांची मराठवाड्यांतील प्रमुख व प्रतिथयश कवि म्हणून ओळख करुन देण्याची अवश्यकता नाहीं. प्रवाही रचना व सर्व विषयांवर विपुल लेखन हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. 'वसंत', 'महाराष्ट्र', 'दीपलक्ष्मी' सारख्या मासिकांतून त्यांच्या कविता नेहमी प्रसिद्ध होत असतात. मंगेश पाडगांवकर, महाराष्ट्र कवि यशवंत, वसंत बापट, सोपानदेव चौधरी, वा. दा. गोखले आदि महाराष्ट्रांतील प्रसिद्ध कवि व साहित्यिकांनी त्यांच्या कवितेचा पुरस्कार केलेला आहे. अंबेजोगाईच्या वातावरणांत आपल्या कवि मनाला पुन्हा एकदा नवीन उजाळा व गती मिळाली असे त्यांचे म्हणणे आहे. महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशन विभागातर्फे आयोजित केलेल्या योजना साहित्य स्पर्धेत यांच्या कवितेस दुसरे बक्षिस मिळाले आहे.

पंख्यावाणी डोईवरती झुलवित हात
भिवयांची ओढुनि आतुर उंच कमान.
उंचावुन बघते टकमक गोरी मान कुणाची वाट .... कुणाची वाट ....
धा तिरकिट् .... ता तिरकिट् .... धा तिरकिट् .... ता तिरकिट्....

कुणी न दिसलें बाइ मी फसलें
.... असें कसें ग घडलें ?
क्षण कासाविस झाले, चंचल डोळे, ....
टपोर काळे !
क्षणभर झांकुन ढगांत गेलें, चंद्र बिंब वाटोळें
धा तिराकिट् .... ता तिराकिट् ....

आली कानीं ओळखिच्या घोड्याची टाप
गुर्गुर् थड्थड् टप्टप् खड्खड्
गोऱ्यापान हाताने मागें घुंगट केला
ओठांतुन पवळ्याच्या खुद्कन् चंद्रम हंसला
मेंदीच्या तळव्यांत नाचली एक भिंगरी
छूम् छूम् छन्नन् छूम् छूम् छन्नन्
पैंजणांतुनी हलके हलकें मिरवित आल्या
स्वरकोमल मंथरपद सुस्वर संथलयीच्या नादपऱ्या
धा तिराकिट्.... ता तिराकिट्.... धा तिरकिट्.... ता तिरकिट्....

दारावर वाजतसे प्रेमखुळी टिचका ग
काय करूं .... ? मी जागी .... सांगतसे उचकी ग .... !

लव काळिज धडधडतें
धा तिरकिट् .... ता तिरकिट् ....
लव कंबर लटपटते
धा तिराकिट् .... ता तिराकिट् ....
हात हातीं देतांना तनुकदली थरथरली
चुबुक् चुबुक् पापणींत लाज असे थबथबली
धा तिराकिट् .... ता तिराकिट् .... धा तिराकिट् .... ता तिराकिट् ...

*****

# महाकवीची मूर्त कल्पना

उत्तररात्रीं पिउन चांदणें चैत्रपालवी फुटे
मोहरलेल्या आंबराइतुन गंधित वारा सुटे
कळयांत दडलीं स्वप्नें बाहिर स्फटिकासम चांदणें
उघडे पडतां टिपून घेइल रूप जळांतुन तळें
झरे गारवा गर्द तरूंचा छायेतुन भूतळीं
गारठुनी कवडसे लपविती स्वतःस दूर्वांकुरीं
वेंचायाला वनराईच्या स्वप्नफुलांचा सडा
छेडित वारा फुलवेडीचा कुण्या किणकिणे चुडा
कुंदकळयांच्या पैंजणांतुनी गंधित मंजुस्वनें
उलगडती मृदु अंथरुनिया पायघड्या चांदणें
मेंदीभरल्या पावलांतुनी मंथर गतिच्या खुणा
वरी उमटती विहरत असतां कोण रूपयौवना
कुजबुजल्या तारका कोण ही मंत्रमुग्ध बालिका
वेणुरवाने भरुन गात्रें फिरे पिशी राधिका
झगमगणारा पदर सावरुन वदे चटक चांदणी
नृत्य पाहिलें सखे हिचें मी इंद्राच्या अंगणीं
छे ग बाई नसेल का ही रती मदन विव्हला
लालबुंद मृदु धुंद हांसती ओठ कळ्या चंचला
आणि कुणीसे वदे उमजलें कोडें मजला गडे
उत्तर रात्रीं गुलाब कळिला स्वप्न गुलाबी पडे

श्रवुनी हा संवाद रथांतुन येई निशेचा दुवा
लगबग बुरखा घेउन भवंती लवे रुपेरी थवा
व्यर्थ हिजपुढे मिरवायाची लाज वाटते मना
वदे चंद्रमा हिच्यापरी ही, हिला न उपमा कुठे
साठविण्या हें लाघव साक्षात् शब्दब्रम्हही थिटें
लेखुन चंद्रानना करूं का माझी अवहेलना
मीच जाणतों मम कांतीतिल कुरुपपणाच्या खुणा
देवि शारदा वीणा छेडुन हिला लाविते लळा
हिला पाहतां तिलोत्तमेची आठवते अवकळा
चाहुल घेतां दाहि दिशांचे कोषहि पडती फशी
महाकवीची मूर्त कल्पना कधी विहरते अशी

o—o

मराठा ग्रंथ ... ग्रंथपत.
अनुक्रम .................. दि. ....
क्रमांक .................. नों. दि: ....

# चुंबन धुंदी

मंद समीरण
झरतां झरतां
देउन गेला
गंधामंत्रण
खिळवुन गेला
नेत्र – निळेंपण
जुळवुन गेला
........ स्पर्श सुखाची नजरबंदी
सखे, लंघुनी
हळवें अंतर
फुलपायांनी
तुझी आठवण
झिळमिळ आली
देउन गेली
दंतव्रणासह
........ गहरी....लहरी....चुंबनधुंदी

—०—

# बस स्टँडवर

बस स्टँडवर
एक छडीदार अंगाची, तांबूस रंगाची
तिरप्या भांगाची, तरतरीत पोर उभी आहे.
मखमालीची सैल विजार,
झिरझिरीत अंगरखा ........
कच पाशाचा मोर कुंचला
कानांत गोल कर्णफुलें, हालतात खाली वरी
शिणगार अदाब करी ........
दातांतली मिठी गोळी, मुरका मारून
रुबाव करी
तिथे ओठावर
दुपारच्या उन्हाचा आळसावलेला उष्मा
तांबूस झिळमिळ वसन वाळवीत आहे
थंडगार डोळ्याच्या .... काळ्याभोर चष्म्याच्या
वाळ्याच्या सावलीत ........
बस स्टँडवर

* * * * *

बस स्टँडवर
एक दुचाकी, .... उन्हांत चमकत, ठुमकत ठुमकत आली
वरचा मालक शीळ घाली ........
पांढऱ्या कॉलरवर
डोळे फाडून .... अंग झाडून .... रंग न्याहळून
पहात आहे, म्हणत आहे ....

'काय सालीचा दाब आहे' !
हूं नाही चूं नाहीं
माझी दुचाकी, .... चल बाई
पायडलच्या तालावर, बसच्या मागावर
कुठेतरी केंव्हांतरी .... ....
झटेल ही गठेल ना ! बस स्टॅंडवर.

बसस्टॅंडवर
एक टॅक्सी.... ओक्सा बोक्सी....रडत धडपडत....आली
शिगार अर्धी जळत आहे
राख न झाडतां गळत आहे
कांद्याची मिसळ न खाता मळमळत आहे
असा ड्रायव्हर
खुबीने भिवइचे सिग्नल उंचावीत आहे
अदबीनें हॉर्न दाबीत आहे
आवाज कापीत म्हणत आहे....“ बाइसाब कहां जाना ” ?
हूं नाही चूं नाही
माझी टॅक्सी....चल बाई
कुठेतरी, केंव्हांतरी, झटेल ही गठेल ना बस स्टॅंडवर !

*  *  *  *  *

बस स्टॅंडवर
अशी अपटी खाणाऱ्यांना
मेंदुसाठी टॉनिक हवे

म्हणून एक उनाड पोर....झाले आहे शिरजोर
बस स्टँडवर झरकन् येई, डोळे फाडीत गंमतीने
हात हलवीत....आवाज खुलवीत
हेल काढी....इग्लीस .. मॉऽलीश हे रे मॉऽलीश...
बस स्टँडवर या गंमतीची
रहदारीतील एखाद्याला....कळते खोंच
त्याचे कारण नसताना तो
उभा राहुनी, मधुनी मधुनी हंसे उगाच
खुशाल घाली त्याला डोळा मालीश वाला....
बस स्टँडवर !!

मराठी ... ग्रंथप्रत.
अनुक्रम 35328
क्रमांक ... काव्य....
नों. दि. ...

# ऐलमा-पैलमा

ऐलमा .... पैलमा ....
खळ ग झिम्मा .... नाच ग घुमा ....
ऐलमा .... पैलमा ....
ऐलतीरीं हिरवळ .... पैलतीरीं पाणथळ
चुबुक् चुबुक् वाहताना अंग मुरडीते जळ
ऐलतिरी गावर्धन .... पैलतिरी वृंदावन
अटक् मटक् पापणींत - डोळे मोडी गवळण
ऐल कळ्या डुलता गे .... पैल गेंद फुलती गे
ठुमक् ठुमक् चालताना - झुळुकेला ठेंच लागे
ऐल सोडवेना मिठी ... पैल तोडवेना दिठी
धडक् धडक् काळजांत - लपे उतावीळ घरी
ऐल चांद उगवला .... पैल दीस मावळला
चमक् चमक् चांदण्यांत - पंचमीचा झुले झुला
ऐल मेंदी .... पैल मेंदी
ऐल धुंदी .... पैल धुंदी
नाच ग धुमा ....
नाच ग धुमा ....
ऋतुराज अनागुंदी .... ऐलमा .... पैलमा ....

०—०

# रंग पंचमी

आधिच तूं हिंमगौरी त्यातुन रंग खेळलिस फुलांसवें
प्राजक्ताची तुडवुन पखरण आरक्त झाले ग तळवे.

मादक पिवळ्या कनक रसाने
शेवंतीनें तुज भरिले
तरिच तुझ्या श्वसनांतुन झरती
गंध रसांचे मधु प्याले.

त्यांत शिंपुनी गुलाब गेला
गुलाब पाणी तनुवरती
[illegible]जाकुल ते ढंग दाखवित
रंग मुलायम घमघमती

हरित तृणांनी हिरवट रंगी -
मृदुल करीं मठविला चुडा
भ्रमर ओतुनी गेला नयनीं
काजळ भरल्या तरल कडा

आधिच तूं हिमगौरी त्यांतुन
रंग खेळलिस फुलांसवे
ओठि दिठी भरल रसरसले
नवरंगांचे मृदुल दुवे

अल्लड पोरी ! खेळलीस तूं रंगपंचमी अशी कशी ?
फिकट पडले .... दागदागिने .... सोने बावन कशी

—

# ताई आज भाऊबीज !

ताई आज भाऊबीज
तुझा भाऊ तळमळे
काय बेगडी शब्दाने
करूं हृदय मोकळें ?

असशील उतावीळ
मला न्हाऊ घालावया
सांग कशाला लाजवूं
दाखवून दीन काया ?

सदाफुली सारखी तूं
कोमेजशील पाहून
वठलेल्या तरुपरी
माझें भयाण जीवन ....!

माझें दाखवूं ठिगळ
माझी दाखवूं लाचारी
सणासुदीत तुला कां ?
करू उदास अंतरी

ओवाळशील प्रेमाने
सोनियाचें नीरांजन
करु किंमत कशाला
नाणे रुपेरी टाकून ?

तुला वाटेल दागिना
माझी फुटकी कवडी
मला नाही कां ठाऊक
माया ताईची भाबडी

सारें समजे उमजे
तरी पाझरती डोळे
नको म्हणूस वड्या
ताई ! अंतर कोवळें

* * *

ताई आज भाऊबीज
नको होऊस हिंपुटी
माझ्या दिशेने ओवाळ
राग घालूनिया पोटीं

# कृष्णासाठी....राधेसाठी....

कृष्णासाठी
ओठी दिठी
मधु कुंभ .... भरुनिया ....
कदंबाच्या
झाडाखाली
रात आली .... पूनवेची ....

राधेसाठी
नदीकांठी
मऊ मऊ गवताच्या
शेजेवरी
वारा करी
पखरण सुगंधाची

# अर्थ लावितों

लाल चुटुक ओठांचा पक्षी
जवळी जातां उडे अभाळीं
इवल्या डोळ्या मधून लक्षी
मनांतलीं खिंडारें काळीं

सखे ठेवितां मस्तक वक्षीं
तुझ्या मिठीचा अर्थ लावितों
लाल चुटुक ओठांचा पक्षी
स्मृतींत माझ्या कां ? घुटमळतो

०००

मराठी ग्रंथ ... स्थळप्रत.
अनुक्रम ... दि.
क्रमांक .................... नों. दि:

# आले आले ज्ञानदेव

आळंदीच्या पालखींत
आले आले ज्ञानदेव ।
संतसंगे भक्तमेळा

पुढे भाविकांची दाटी
ओवी अभंग मराठी
उधळीत भक्तिभाव ।

पायवाट शृंगारिली
शिंपुनिया गंगाजळ
पाखरिते प्रभावळ
दाही दिशांचें लाघव ।

भरावया पालखींची
खणा नारळांनी ओटी
मुक्ताईच्या भावासाठी
सुहासिनी घेती धांव ।

न्हाउनिया अमृतांत
शद्ब गाती हरिपाठ
मराठीचा थाटमाट
मिरवीत गांवोगांव ।

दिंडी आली भीमातटीं
आनंदली चंद्रभागा
जल नाचवी तरंगा
नामगजराचा रव ।
हांक टाळ मृदंगाची
देवाचिया कानीं पडे
विटेवरी अवघडे
भेटीसाठीं घेई धांव ।

०००००

# सणासुदीचा विडा रंगला

सणासुदीचा विडा रंगला त्यांत ओठ तर कवळे ग
किती वडाच्या पारंब्यांवर भिरभिर घेसी झोले ग
कचपाशांतिल सुटे केवडा
पलीकडे चिरबंदी वाडा
सावर झोका तिथे अखाडा
चंचल पोरी वाऱ्यासंगे कां करसी शिरजोरी ग
कां सासरची शीव पाहसी रीत तुझी तर न्यारी ग
बघ वेणीची सुटली पेडी
काजळली ग नजर वाकुडी
भिरभिरते वाऱ्यावर साडी
गोऱ्या पायीं पडले उघडे नवीन तोडे पहा कसे
कापित वारे धारीवानी गिरके घेसी हवे तसे
बांधुन होता का मुंडवळी
नागपंचमी आली पहिली
प्रौढत्वाची जाणिव नुरली
अंगांगांतुन बालपणाच्या उठल्या मधु सुख-लहरी ग
सणासुदीचा ओठावरती विडा रंगला जहरी ग

# तांबुस तिरकस उन्हें फिरकली

तांबुस तिरकस उन्हें फिरकलीं ऊसमळ्यांतुन
एक लावणी मुकी अडकली तुझ्या गळ्यांतुन
मनांत होता तबल्यावरती धरला ठेका
नथ मोत्याची नकळत गेली मारुन मुरका

मोटेवरची निवांत होती दुपार वेडी
न्हाउन होतिस तूं बसलेली उन्हांत थोडी
जळांत हात्या मिठींत बंदी दोन सावल्या
नीखतेच्या ढाळित चवऱ्या सेथ डहाळ्या

अळीमिळी तर घालुन गेला होता वारा
कसा ठिबकला जळांत जांभुळ एक बावरा
भुर्रकन गेले पडछायेचे उनाड पक्षी
उरली केवळ जललहरींची पोकळ नक्षी

# प्रा. प. श्री. संभूस

प्राध्यापक प. श्री. संभूस यांची ओळख मराठवाड्यास नसली तरी त्यांचा काव्याचा व्यासंग दांडगा आहे. श्री. संभूस हे योगेश्वरी महाविद्यालयांत मराठीचे प्राध्यापक म्हणून अलिकडेच मराठवाड्यांत आले आहेत. मराठी वाङ्मयाचे साक्षेपी अध्यापक म्हणून त्यांचा उल्लेख करतां येईल. आतापर्यंत अस्थिर जीवनाच्या वाटचालीमुळें त्यांना प्रकाशांत येण्याची संधी मिळाली नसली तरी त्यांनी विपुल व वैशिष्ट्यपूर्ण लेखन केले आहे.

३५३२८ वि. काव्य

# ओल्या नारळाचा कीस

ओल्या नारळाचा कीस
गर्द चांदणें पेरलें
शुभ्र पयोद अंबरीं
रूप – रेखीव – पिंजलें

कळ पिळूनीया गेली
त्यांची रात्रभर काळी
आतां पहाटे प्रसन्न
कोर आभाळाचा भाळी

अशी गोमटी पहांट
तिला हुंगावें हुंगावें
अष्ट – अंगांनीं तियेचें
रूप जिरून घ्यावें

—०००००—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२८७०

# दीस !

दीस
पुनः पुन्हा दीस
कामाच्या झपाट्यांत
कमरेला लपेटून पदर चटकदीस
गालावर रेंगाळणाऱ्या
सैराट केसांच्या बटासवे माझ्या
उनाड दृष्टीचा अव्हेर करीत
उपसतांना पाणी, सपकतांना धुणीं
विसळतांना भांडीं
अंधाराच्या खोचलेल्या
ओच्यांतून डोकावणारी
पहाटेची मांडी
पारोशी, कामाच्या पसाऱ्यांत गढलेली
स्नानशुद्धी होण्यापूर्वीची
अशीच दीस
पुनः पुन्हा दीस
तशीच हवीस !

—०—

# तूंच पाऊल पुढे टाक

निःसंकोच चमकणारी तूं
शुक्राची तेजस्वी चांदणी
अन् मी ............
अंमळ लालसर लाजरा बुजरा मंगळ
तुझ्या श्यामल रुपाची
खळाळणारी ............ निळावंती न्यारी
स्थिर तुझ्या नजरेंतील
रुप्याचें चमकतें पाणी
माझें मात्र ............
बिथरलेलें काळीज अन् अस्थिर वाणी
तूं क्षितिजावर दिसतेस
थोडाच वेळ सांजसकाळ
पण पाहतेस मात्र टक लावून
( तटस्थपणें ? )
मी मात्र ............
नित्याचाच डळमळलेला, घुटमळलेला
तुझ्या पायरीला माझे पाय
कदापिही लागणार नाहीत
तूंच पाऊल पुढे टाक
एक पायरी खाली उतरुन
तूंच मार मला हांक

.... ....

# अहिल्या

अशा पहांटेच्या वेळीं गौतमाचें छद्मरुप
अजाणतां कवळलें झालें निरागस पाप
शुभ वेळीं अशुभ हें कसें घडलें एकांतीं
पुण्यशीला पापवती क्षणीं ठरली लोकांतीं
आकाशाची मंदाकिनी आश्रमांत होती गंगा
पाताळींचीं भोगावती आज झाली शीलभंगा
किंवा सुषुप्तींत होती जाग्रतींत येण्याआधी
ज्योत दीपाची विझून जडे जन्माची उपाधी
तुझा तुझ्या नकळत झाला व्रतभंग आज
तुझ्या साऱ्या जातीलाच इंद्र आणितसे लाज
ब्रह्मचारिणीच्या सत्वीं राजसाचा रजोगुण
पहाटेला बाटविलें कुक्कुटानें आरवून
वैराग्याच्या वल्लरीशी वसंताचा वारा झटे
सौम्य रक्ताला कोमट कोंम लालबुंद फुटे
निवळीचा शुभ्र चुना त्यांत पाणी भडकलें
ब्रह्मपुत्री ब्राह्मणीचें पातिव्रत्य तडकलें
पहाटेच्या रूपांतही काळोखाची मध्यरात्र
कालियानें गढूळलें यमुनेचें सरित्पात्र
देवतेची मानवी हो परम ही रुपवती
उल्केपरी शिळा झाली युगायुगांची असती

शिळा पण झाला नाही
अबलांचा अधिताप
सीता द्रौपदी तारांचा
चाले आजही संताप

० ० ० ० ० ०

आहिल्येचें शल्य मला
आज पुन्हा ठणकतें
पहाटेच्या पितळाचें
रुप उघडें पडतें
आज सिंध पंजाबांत
झाल्या कितीक गौतमी
पहाटेच्या नांवाखालीं
बुडाल्या त्या अंधतमीं
निर्वासितां विचारावे
केवढे हें घोर पाप
हाय ? लाभलाही नाही
गौतमाचा क्रुद्ध शाप
शापाचेही वरदान
नाही मिळालें तयांना
दुर्बलाचे दोन आंसू
दीन अशा आहिल्यांना

# अखेर मी अपुराच राहिलों

अखेर मी अपुराच राहिलों
स्वजनांच्या मेळाव्या मधुनी
अखेर मी उपराच राहिलो
अनंत अवकाशाला निरखित, नित सायंतन
करित राहिलों मनांत चिंतन
चिरनूतन जें असुन सनातन
तें हे जीवन .... .... ....
भव्य तयाच्या कडांकडांवर
छटा रुपेरी बघत राहिलों .... ....
असाच उरलों कडांकडांवर, परि परिधावर
भटकत बसलों .... ....
भरकटलों पण, केंद्र दिसावा कसा तयाला
परिधावर जो भ्रमत राहिला ?
छटा रुपेरी बघतां बघतां .... ....
मस्तकातल्या केशाग्रावर
उमटुनी आल्या
आणि निमाल्या वृत्तिच साऱ्या !
एकच जाणिव, उणीव एकच
सलत राहिली .... ....

‘ जीवन सरलें ’ परिनच पुरलें
अपुरें पण अन् उपरें पण दैवी हें उरलें
सृजनांचें गहिरें हिरवेंपण पुरें हरवलों
पुराच हरलों .... .... !
अखेर मी अपुराच राहिलों
अखेर मी उपराच राहिलों ! !

—ooooo—

# माझ्या अंबानगरींत

माझ्या अंबानगरींत वनराई घनदाट
कपारींत डोंगराच्या गाई ओवी नदी कांठ
माझ्या अंबानगरींत हवा उनाड डोंगरी
खिदळती माळावरी जशा अहीरांच्या पोरी
भर माध्यान्हीला तेथे उन कोवळेसें भासें
त्यांत मिळून वृक्षांचें गोड गारपण हांसें
ऐन ग्रीष्माच्या कहारीं फुले वसंत बहार
आणि जोडीला विपुल फळे आम्र सहकार
हात पालवी सुगंधी रानफुलांची झुळूक
तरंगत्या पाखरांचा जाई अचानक झोक
आहे पुनीत रायांची कृपा गिरीदरीवर
पत्थराच्या काळजांत तिथे कोरीव पाझर
बुट्टीनाथासी अजून मुळी अजानुवृक्षाची
आणि कड्याच्या तळाशी शोभा काळ्या कातळाची
कड्याच्याच कडेवर आहे मुकुंद मंदीर
पायी दरींत खळाळे छोटी जयंती सुंदर
वैनगंगा प्रलीकडे खुणावते जयंतीला
तीन कड्यांच्या दरींत चाळे संगमाची लीला
इथे विसावतां क्षण जातों विसरुन जग
नकळत नीवतसे जीवनाची तगमग

०—०

# सावल्यांच्या साम्राज्यांत

सावल्यांच्या साम्राज्यांत सारेंच कसें बिनबोभाट
करुन सवरुन पुन्हा आपली मान मात्र राहते ताठ
चोरट्या तिरप्या कटाक्षांना चुंबनांची फिटंफाट
नकळत रेशमी धाग्यांनाही सैलसर नाजुक सुरगांठ
तुझी माझी असली गांठ तुलाही न व्हावी ठावी
मला मात्र पुनः पुन्हा आठवण तिची होत रहावी
तीन दिवसांत चार वेळां जातां येतां पाहिली आहे
सुरगांठीचा एक पदर हळूंच ओढून राहिली आहे
सावल्यांची ती कच्ची गांठ सरकन् कधी सुटून जाते
टाळ्या पिटून त्याचबरोबर मन हात झटकून घेतें
भलतांच पदर चुकून ओढलास तर मात्र पक्की गांठ
त्याच्यापेक्षा असलीच बरी स्वप्नामधली चोरवाट

# परत सखे

परत सखे परत सखे
रात्र अशी अधुरी ग
उलगडली स्वप्न-मिठी
निद्रेसम अपुरी ग
हृदयाला भरती ये
कढत कढत लाटा ग
श्वासावर रोमांचित
सहज फुले कांटा ग
नयनांतुन नीन उडे
लव लवली बिजली ग
भरभरली घनदाटुन
पयदमाळ जुटली ग
वद न सखे, वदन कथी
पुलकभरी गाथा ग
दरवळुनी उसवतसे
इंद्रधनुष माथां ग
कोमल हिमधवल पिसें
तनुंतुन तव गळलीं ग
चांदरात लज्जित हो
अपर-दिशे ढळली ग
परत परी पूर्व खुले
क्षितिजकडा भरली ग
फटफटत्या स्वप्नांतुन
शुद्धबुद्ध हरली ग

.... .... ....

# अशा तुडुंब डोहांत.

अशा डोहांत तुडुंब
कधी राहावे डुंबत
लाटा लावण्याच्या तृप्त
उसळाव्या. कांठोकांठ

अशा लाटांच्या स्पंदनीं
व्हावा पुलकित डोह
रंग तरंगामधून
पुन्हा मोहरावा मोह

वर पिंपळ डुलावा
धुंद नाग–सळसळ
गोड ठिबकावे डोहीं
त्याचें मधाचें मोहळ

असें जळाचें मार्दव
सांद्र चिमटीचा द्रव
कृष्ण कमळीं नितळ
भ्रमराचा गुंजारव

—०•०००—

# परत सखे

परत सखे परत सखे
रात्र अशी अधुरी ग
उलगडली स्वप्न-मिठी
निद्रेसम अपुरी ग
हृदयाला भरती ये
कढत कढत लाटा ग
श्वासावर रोमांचित
सहज फुले कांटा ग
नयनांतुन नीन उडे
लव लवली बिजली ग
भरभरली घनदाटुन
पयदमाळ जुटली ग
वद न सखे, वद न कथी
पुलकभरी गाथा ग
दरवळुनी उसवतसे
इंद्रधनुष माथां ग
कोमल हिमधवल पिसें
तनुंतुन तव गळलीं ग
चांदरात लज्जित हो
अपर-दिशे ढळली ग
परत पंरी पूर्व खुले
क्षितिजकडा भरली ग
फटफटल्या स्वप्नांतुन
शुद्धबुद्ध हरली ग

.... .... ....

# अशा तुडुंब डोहांत.

अशा डोहांत तुडुंब
कधी राहावे डुंबत
लाटा लावण्याच्या तृप्त
उसळाव्या. कांठोकांठ
अशा लाटांच्या स्पंदनीं
व्हावा पुलकित डोह
रंग तरंगामधून
पुन्हा मोहरावा मोह
वर पिंपळ डुलावा
धुंद नाग–सळसळ
गोड ठिबकावे डोहीं
त्याचें मधाचें मोहळ
असें जळाचें मार्दव
सांद्र चिमटीचा द्रव
कृष्ण कमळीं नितळ
भ्रमराचा गुंजारव

—०•०००—

# चकमकतें तारांगण

चकमकतें तारांगण थरथरत्या नील नभीं
चंद्रकोर वर विलसे तूंहि तशी येथ उभी
बाक चंद्रकोरीसम नाजुक देहांत तुझ्या
देण्यास्तव आलिंगन विस्तरल्या उभय भुजा
तव तनूंत प्रतिबिंबे विश्वांतिल वस्तुजात
लुब्ध नयन लुब्धकसे फिरफिरुन पाहतात
झाक गडे कुसुमांनी देह तुझा स्फटिकासम
नातरि सप्तर्षिसही पडतो बघ त्या संभ्रम
काय सखी सांगु तुला मध्यरात्र भांबवली
हे सुंदरि देख तुवा गतिच तिची थांबवली
सुंदरता निथळतसे अंबरांत ताऱ्यांतुन
आणि गमे मूर्ति तुझी साकारित हो त्यांतुन
अशिच रहा मजजवळी कायमची येथ उभी
तगमगुं दे तारांगण थरथरत्या नील नभीं

.... .... ....

## रघु बोरगांवकर

महाराष्ट्र राज्य सरकारच्या प्रकाशन विभागातर्फे औरंगाबाद विभागीय पातळीवर आयोजित केलेल्या योजना साहित्य स्पर्धेत ' अवघे धरुं सुपंथ ' या एकांकीकस पहिले बक्षिस मिळविणारे श्री. रघु बोरगांवकर हे एक चांगल्या-पैकीं नवोदित कवि आहेत. यांची कविता साधी, सरळ सोपी नि सहज आकलन होण्यासारखी आहे.

कॉलेजमध्यें शिकत असतानाच त्यानी छापखान्यांत प्रुफरीडर म्हणून नौकरीस सुरुवात केली. त्यानंतर प्राथमिक शिक्षक, रेल्वे खात्यांत कारकून म्हणून नौकरी करित कस्ति ते बी. ए. ची परीक्षा ऑनर्स मिळवून पास झाले. दयानंद कॉलेज, सोलापूर येथें शिकत असताना ते तेथलि ' कॉलेजियन ' च्या मराठी विभागाचे विद्यार्थी संपादक होते. त्यांच्या ललित निबंधास त्यावेळीं त्याना पहिले बक्षिस मिळालें. सध्यां ते नांदेड येथील प्रथमश्रेणी विकासगटांत समाजाशिक्षणाधिकारी म्हणून काम पहात आहेत.

व्यवसायामुळें त्यांचा ग्रामीण जीवनाशीं घनिष्ठ संबंध येतो. खेडुतांच्या जीवनांतील सुखदुःखें वेचून आपल्या साहित्यांत त्यांची कलापूर्णरितीनें मांडणी करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. विकास योजनेवर त्यांनीं लिहीलेली

विविध चालीची, नव्या धर्तीची गाणीं खेड्यापाड्यांतून लोकप्रिय झाली आहेत. सरकारी विकास योजनेचा प्रसार गरीबांच्या झोपडीपर्यंत करण्याचा त्यांचा प्रयत्न बराच यशस्वी होत आहे 'आम्ही आलो या गांवाला' आणि 'साऱ्या गांवाचा विचार ठरला' या गाण्यासहि त्यांना सरकारी बक्षिस मिळालें आहे.

आपला व्यवसाय सांभाळून साहित्याची जोपासना करणाऱ्या रघु बोरगांवकरांच्या हातून प्रभावी वाङ्मय-निर्मिती होईल अशी आशा आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५३२ वि: काव्य
क्रमांक ........ नों दि. १७

## — चंद्र लपे पापणींत

निंबोणीच्या झाडामागें
चंद्र पुनवेचा आला
आलें रांगत चांदणें
व्यथा लागली मनाला ॥ १ ॥

होती अशीच पौर्णिमा
चंद्र घरांत हंसला
मानूं कोणता चंद्रमा
गोड संभ्रम मनाला ॥ २ ॥

चंद्र धरेचा ढळला
तरी पौर्णिमा फुलते
निथळत्या चांदण्यांत
घरीं अवस नांदते ॥ ३ ॥

चंद्र नभींचा पाहून
हुरहुरते सारी रात
स्वप्नीं पहांटे धरेचा
चंद्र लपे पापणींत ॥ ४ ॥

—

# - ऑफीसचा रंग.

पिवळें ऑफीस काळी पाटी
रोज पहातो पोटासाठीं ॥ धृ. ॥

पिंगट खुर्ची टेबल तसलें
कपाट हिरवें उभें बापुडें
कार्बन काळा निळ्या फायली
पिवळें कागद जिकडें तिकडें ॥ १ ॥

हिरवट आहे बॉस आमुचा
गोरा जरी तो वरुनी दिसतो
काळ्या रागीट त्या टाकानें
चुका तांबड्या पहा काढतो ॥ २

टिक् टिक् चाले घड्याळ काळें
नीळसर पंखा कधींतर फिरतो
खाकी डगले घाली शिपाई
जीभ तांबडी सदा चावतो ॥ ३ ॥

दुपार पिवळी उदास बसते
निळ्या शाईचें काम चालते
पिवळा हत्ती तपकीर थोडी
चहा तांबडा तलफ भागते ॥ ४ ॥

चिमणी काळा धूर ओकते
लाल लाख ती हळूं पघळते
पाकीट पिवळें सील तांबडें
तिकीट जांभळें लावून नटते ॥ ५ ॥

काळी एकच टंक लेखनीस
फिच मनाला भुरळ पाडते
लाल नखांची नाजुक बोटें
किट् किट् करता डोके उठते ॥ ६ ॥

रंग निराळे असे पाहूनी
रक्त तांबडें थिजून जातें
मनास उज्ज्वल आंकाक्षेचें
स्वप्न गुलाबी सदा टोचतें ॥ ७ ॥

## — अभ्यास

माझ्यापुढें तुझी जागा
पाठमोरी तूं बसली
चाले वर्गांत अभ्यास
मनीं प्रतिमा ठसली ॥ १ ॥

केसांतला गुलाब तो
उगा वेडावतो मला
अवखळ वेणी तुझी
सांगे भाव मनांतला ॥ २ ॥

सावरता सावरेना
तुझा तुला ग पदर
लपवितां लपेल कां
मुक्या कळ्यांचा बहर ? ॥ ३ ॥

तास संपता कळालें
तुझ्या हृदयाची चोरी
माझ्या प्रमाणेंच दिसे
तुझी सुद्धां वही कोरी ॥ ४ ॥

....

## — ओढ.

स्मृतीच्या कुशींत विलगते जेंव्हा
सुखाचा वर्षाव होतो शिरी तेंव्हा ॥ १ ॥
कालाचीं क्षितीजें ओलांडून सारी
माहेरी धावते मनाची भरारी ॥ २ ॥
झाडांच्या गर्दीत नदीच्या काठाला
माहेर तें माझें पुण्याच्या वाटेला ॥ ३ ॥
चिरेबंदी वाडा माझ्या ग बाबांचा
लक्ष्मीचा वास तिथें माऊलीचा ॥ ४ ॥
पडक्या शाळेची उजळणी झाली
चोरट्या चिंचेनें जीभ सुखावली ॥ ५ ॥
रागीट पंतोजी वेताची ती छडी
चोरुन खेळली शाळेंत फुगडी ॥ ६ ॥
पंचमीचा झोका उंच उंच गेला
फटाक्याची मजा दिवाळी सणाला ॥ ७ ॥
हरितालिकेचा केला उपवास
सौभाग्यासाठीं त्या पूजिलें वडाला ॥ ८ ॥
सोहाळा लग्नाचा गावांत गाजला
गांव सोडताना उमाळा दाटला ॥ ९ ॥
कुबेराचं भाग्य लाभलं हें जरी
ओढ सदा माझी मायेच्या माहेरी ॥ १० ॥
भरारी संपतां मन विसावते
स्मृतीची ती कूस तेंव्हां ओलावतें ॥ ११ ॥

# आज आलीस स्वप्नांत ........!

आज आलीस स्वप्नांत
गुलाबी या उषःकालीं
जाग येतां आतां मला
उशी मात्र ओली झाली ॥ १ ॥

अशी येतेस स्वप्नांत
छेडतेस मला पुन्हा
गेलीस तूं एकटीच
काय झाला माझा गुन्हा ? ॥ २ ॥

उठे आता बाळराजा
भूक बाळाला लागली
रडे त्याचें हें थांबेना
देतां दुधाची बाटली ॥ ३ ॥

किण् किण् बांगड्यांचा
नाहीं आवाज सकाळीं
गात अमर भूपाळी
नाहीं दारांत रांगोळी ॥ ४ ॥

येशील कां आतां पुन्हा
बाळाला या घेण्या कुशी ?
उजळाया घर माझें
दारीं वाळली तुळशी ॥ ५ ॥

....

# अेका भक्तासाठीं ....!

एका भक्तासाठीं । उभा विटेवर
देवा थांबणार । किती युगें ?
लाख पुंडलीक । आईबापा साठीं
पहा अर्धपोटीं । राबतात
जनीच्या जात्याला । दळण मिळेना
चूल ती पेटेना । चोखोबाची
सावता माळी तो । दुःखानें गांजला
मळा घालविला । कर्जापायीं
आषाढी कार्तिकी । भक्तजन येती
दारीं लाथा खाती । दर्शनास
मंदीरांत झाली । धनिकांची दाटी
भक्त नदीकाठीं । उपवासी
नावडे कीर्तन । तुक्याचा अभंग
झालास तू दंग । वैभवांत
बडव्यानीं तुझा । मांडला बाजार
झाला तीन वार । सौदा तुझा
हात कटीवर । ठेवूं नको आतां
अनाथाच्या नाथा । विठ्ठला रे
सोडून गाभारा । येई वाळवंटीं
आतां जगजेठी । सोड वीट

....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३४३२८ वि. काव्य
नों. दि. १७.८.५७
स्थान

# श्री. गोपाळराव वांगीकर

मराठवाड्यांतील जनतेला श्री. वांगीकर यांचा परिचय करुन देण्याची अवश्यकता नाहीं. परभणी येथें ते वकीलीचा व्यवसाय करीत असले तरी एक विनोदी कवि म्हणून मराठवाड्यांत त्यांची ख्याती आहे. त्यांना राजकारणाचे आकर्षण असून प्रत्यक्षारित्या ते त्यांत भाग घेतात. हल्ली ते " मावळा " साप्ताहिकाचे संपादन करीत असून स्थानिक सुधारणेवर जास्त भर देत असतात. त्यांची कविता ही कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखल्या जाते." मिर्च्यांचे खळे " हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशनाचे वाटेवर असून लौकरच तो मराठीच्या रसिक वाचकांसमोर येईल. पुरोगामी विचारसरणी, प्रतिभेचा स्वैरविलास व जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणारी यांची कविता मराठींतील रसिकांना आनंद देत राहील.

o — o

# भरल्या पोटीं ब्रम्हज्ञान

भरल्या पोटी ब्रम्हज्ञान
जगा सांगतो ढेकर देउन ॥ ध्रु ॥
मिष्ठान्नाचें आकंठ भोजन
अजिर्ण होईतो करी सेवन
बुभूक्षितांना सांगे तो पण
भाकरीचें कां गुलाम आपण ॥ १ ॥

प्राच्य संस्कृति स्मरा आपुली
केवळ खाण्या साठी न जन्म
राम सिताहि जगले जीवन
कंद मुळें अन् पाला खाउन ॥ २ ॥

मुळी न ज्यांच्या घरी अन्न कण
तयांनाच हा सांगे निक्षून
क्षुधितांना द्या मुठभर धान्य
घरी कोठारी धान्य दडवून ॥ ३ ॥

उपवाश्याला उपवासाचे
पुण्य काय ते करिती कथन
अेकादंशीला स्वतः सेवीतो
आमलेट अन् खीमा चापून ॥ ४ ॥

असून भार्या स्वतःस दोन
अंगवस्त्राहि अलग ठेउन
तरुण कुमारा सांगे ठासून
ब्रम्हचर्य हे खरेंच जीवन ॥ ५ ॥

तीनताल ती माडी थाटून
स्वतःसही महाल बांधून
पर्ण कुटीचा महिमा सांगे
पथावरी जे पडले दुमडून ॥ ६ ॥

कण्व मुनी अन् व्यास वाल्मिकी
परंपराहि स्मरा पुरातन
पर्णकुटींतच जन्म पावलें
पवित्र भारत अन् रामायण ॥ ७ ॥

प्रछन्न उघडे तयास सांगे
शाल भरजरी स्वतःपांघरुन
पूर्वज आपुले असें राहिले
शुद्ध वल्कले वनांत लेवून ॥ ८ ॥

मुल मुली ज्या घरांत डझन
तरी न थांबवी प्रजोत्पादन
तोच सांगतो व्याख्यानांतून
संततीचे करा नियमन ॥ ९ ॥

भोग विलासी जगून जीवन
त्यागाचे हा करि निरुपण
सेवेचेहि महत्व सांगतो
सत्तेवरती स्वतः लोळून ॥ १० ॥

आहार निद्रा भयनी मैथून
कामक्रोधहि शड्रिपू जाण
दुजा सांगतो नित्य आवर्जून
हा न स्वतः अलिप्त त्यांतून

....

# अन् गंगावनहि पडे गळून

लुब्ध जाहला वेणीवरती
तरुणीच्या कुणी कवि कलंदर
स्फूर्ति झाली कविता करण्या
वेणी सुरंगी पाहून सुंदर

कविस पाहता तिनें परंतू
हिसडा दिधला मान मुरडून
तोंच गळाली फुलें तयांतून
अन् गंगावनहि पडे गळून

()—()

# गृहिणी आणि पाकशास्त्र

पाकशास्त्र हा अमोल ग्रंथ
कुणी गृहिणी करि प्रकाशित
समग्र वर्णी तया होत्या स्पष्ट
पाक क्रिया त्या हजार त्यांत ॥ १ ॥

हिला न जमली कधी तयांतील
अेक क्रियाहि प्रत्यक्षांत
दहिवडे अन् श्रीखंड राहूं द्या
मुळी न जमलें पिठले भात ॥ २ ॥

पति वाचितो मिटक्या मारितं
ग्रंथांतील त्या पदार्थ वर्णन
क्षुधा आपली शमवी पण तो
खाणावळीचा डबा आणुन.

॥॥॥

# नर्क आणि वकील.

स्वर्गलोक अन् नर्कपुरांतील
राहिवाश्यांचा वाद माजला
स्वर्गपुरांतील अेक अप्सरा
कुणी पळविली नर्कपुराला
भरला दम त्या स्वर्गस्थांनी
नर्कपुरीतील सूत्रचालका
कोर्टामाजी करुं फिर्याद
विरुद्ध तुमच्या भरुंत खटला
कोण चालविल खटला तुमचा
नर्कस्थांनी तया पृच्छिले
स्वर्गामाजी वकील कुठलें
ते तर नर्कामाजी सगळे

....

# कोण पुढे तूं होशिल बाळा

आई पुसे निज प्रिय पुत्राला
कोण पुढें तूं होशिल बाळा
शूर शिवाजी गांधी वीर
होशील कां रे बोस, जवाहर
बाळ वदे मग तिजशी सत्वर
होईल मी गे जॉनी वाकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२५१०
REFBK-0012710
REFBK-0012710
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५३२८ वि: Comedy
क्रमांक ........ नों. दि: १७-८-९५